महात्मा गांधीजीच्या शैक्षणिक तत्वज्ञानाची सदयकालीन प्रस्तुता

प्रा.सुनिल ब.भोईटे

सी.टी.बोरा महाविद्यालय, शिरूर

30 सप्टेंबर 2010 रोजी सर्व प्रसारमाध्यमे आणि भारतातील सर्व व्यक्तींनी कमालीची संयम दाखविला. लखनौ उच्च न्यायालयाच्या अयोध्या निकालावर सर्वांनीच सावध भूमिका घेतली व निकालाचा सन्मान केला. यामध्ये सर्वच जाती, धर्म तसेच राजकीय गटांचा देखील समावेश होता.

भारत आणि भारतीयांकडे आलेली ही संयमाची, सहिष्णुतेची भूमिका निर्माण होण्यामागे गांधीजींच्या शैक्षणिक तत्वज्ञानांची काही प्रस्तुतता आहे का? याचा परामर्श घेण्याचा हा प्रयत्न करावासा वाटतो.

व्यक्तीच्या आयुष्याला योग्य शिक्षणाची जोड असल्यास तो समाजभिमुख आचरण करण्यास प्रवृत्त होतो. गांधीजींचे शैक्षणिक तत्वज्ञान देखील याच मार्गाने गेले असल्याचे दिसून येते. समाजाचा शिक्षण घेणारा सर्वात प्रथम असणारा घटक म्हणून आपण बालकाकडे पाहतो. आजचे बालक उद्याचा समाजाचा सशक्त व विवेकशील घटक असतो. या घटकांमुळेच पुढे समाजाचे पर्यायाने देशाचे भवितव्य उज्वल ठरणारे असते. म्हणून या बालकांना मिळणाऱ्या शिक्षणाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. हाच म. गांधीचा बाल शिक्षणाविषयी दृष्टीकोन होता. बाल शिक्षणामध्ये अक्षर ओळख यालाच केवळ महत्व नाही. अक्षर ओळख शिक्षण नसून अक्षरओळख हे शिक्षणाचे साधन आहे. आपल्या पंच ज्ञानेंद्रियाकडून तसेच पंच कर्मेद्रियांकडून बालकाला उत्तम काम करून घेण्याचे सामर्थ्य येणे हा शिक्षणाचा खरा अर्थ आहे. हाताने चोरी करावयाच नसते, पायाने दुसऱ्याला लाथ माराची नसते हे जेंव्हा त्या लहान बालकाला समजेल तेव्हा खऱ्या अर्थाने त्याच्या शिक्षणाला प्रारंभ झाला असे गांधीजी म्हणत असत.

अक्षर ओळख करून देण्याच्या प्रयत्नात त्या बालकाच्या स्वाभाविक प्रवृत्ती व मानसिक विकास यावर आपण बंधन आणतो आहोत त्यामुळे आजची पिढी कमकुवत मनोवृत्तीची बनत आहे. कधी काय निर्णय घ्यावा याचे भान राहत नाही. निर्णय प्रक्रियेत ती परावलंबी असल्याचे दिसून येते. लहान मुलांची बाराखडी acbd-z ते 1 To 100 तोंडपाठ असतात . मात्र निसर्गदत्त क्रिया (शी,सू) करण्यावर त्यांचे नियंत्रण राहत नाही.

स्पर्धेच्या युगात केवळ स्पर्धक म्हणून मुलांना तयार करण्यापेक्षा एक आदर्श नागरिक म्हणून त्याची जडणघडण करणे हीच खरे तर आजच्या काळाची आवश्यकता असते. गांधीजी म्हणतात त्याप्रमाणे बालकांना पंचकर्मेंद्रिये यांचे ज्ञान व कार्य कसे चालते ते सांगून त्याप्रमाणे कृती करून घेतली पाहिजे. कृतीतून शैक्षणिक विकास साधला जावा. साधारणपणे पालक बालकांना स्वतःच्या आवडीचे व सोईचे कपडे घालतात तेथेच त्या बालकाच्या परावलंबीत्वाला

सुरूवात होते. मात्र स्वावलंबी बालक व्हावे यासाठी पालकांनी त्याच्यापुढे कपडयांचे पर्याय पुढे करावे ते नक्कीच एकाची निवड करेल त्यातूनच ते निर्णय क्षमतेत स्वावलंबी होईल.

बाल विकासात आईची भूमिका महत्वपूर्ण असते हे आपणास मान्य आहे. गांधीजींनाही हेच अभिप्रेत आहे. बालकाची पहिला शाळा घर तर पहिला गुरू आईअसते. सुशिक्षित व सुसंस्कृत आईवडिलांच्या मार्गदर्शनाखाली बालकांचा समतोल विकास सहज साध्य आहे. मात्र त्यासाठी आई–वडिलांनी मुलांना पुरेसा वेळ देणे आवश्यक आहे. आजच्या काळात मात्र आई वडील दोघेही नोकरी करणारे असतील तर सुसंस्कृत कुटूंबातील मुले देखिल असंस्कृत वर्तनाला लागलेली असतात. अर्थात याला अपवाद देखिल अधिक असतात. 2020 साली भारताला आर्थिक महासत्ता व्हायचे असेल तर गांधीजीचे हे विचार आचरण्याची अत्यंत आवश्यकता आहे असे मला वाटते.

एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटूंब सुशिक्षित , विवेकशील होऊ शकते. यावर आपण सर्वांचाच विश्वास असण्यास हरकत नाही. तसा गांधीचाही विश्वास होता. स्त्रियांना शिक्षण मिळाल्यास ती युगानुयुगे ज्या दास्यात राहत आहे ते दूर होईल ही भूमिका गांधींची होती. आज त्याचा प्रत्यय येत असून चूल आणि मूल याच्यापलीकडील विस्तीर्ण क्षितीजाकडे धाव घेण्याचे धाडस स्त्रिया करू लागल्या आहेत. शिक्षण तिला स्वाभीमानी आणि निर्भय बनवत आहे. म्हणूनच कल्पना चावला , किरण बेदी या स्त्रिया ठामपणे पुढे गेल्या, जात आहेत. आधुनिक भारताला विवेकनिष्ठ पुरूषांबरोबरच विवेकनिष्ठ स्त्रियांचीही आवश्यकता आहे. ही गरज आज पूर्ण होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. गांधीजी म्हणत असत, स्त्रियांची पारंतत्र्यातून मुक्तता झाल्याशिवाय भारताला नैतिक, भौतिक आणि आत्मिक क्षेत्रात प्रगती करता येणार नाही म्हणूनच स्त्रीशिक्षण महत्वाची गोष्ट आहे.

प्रौढामध्ये असणाऱ्या अंधश्रध्दा, अज्ञान, व्यावहारिक ज्ञानाचा अभाव यामुळे अशा लोकांची अनेकांकडून फसवणूक होते. आपले हक्क व अधिकार काय आहेत याची समज यावी म्हणून तरी प्रौढांना शिक्षणाचा प्रवाहात आणले पाहिजे हा गांधीजींचा प्रौढ शिक्षण विषयक दृष्टिकोन होता. प्रौढाच्या शिक्षणात बुध्दी व श्रम यांची सांगड घातली पाहिजे. स्वराज्य मिळविण्यासाठी स्वातंत्र्य , समता, बंधुता या मूल्यांचे ज्ञान प्रौढ शिक्षणामार्फत दिले पाहिजे. जोपर्यंत या मूल्यांचे योग्य ज्ञान होणार नाही तोपर्यंत सामान्य माणूस स्वातंत्र्यासाठी लढू शकणार नाही. प्रौढ शिक्षणात सुट्टीच्या काळात विद्यार्थ्यांनी शिकविण्याची मदत केली पाहिजे.

सदगुणांच्या आचाराला जी जी गोष्ट पोषक असेल, ती ती धार्मिक शिक्षण देण्याचे साधन मानता येईल. शिक्षणक्रमात धार्मिक शिक्षणाचा अंतर्भाव केला जावा ही म. गांधीजींची भूमिका होती. जी आजही योग्य आहे असेच वाटते. धार्मिक शिक्षण म्हणजे एखाद्या विशिष्ट धर्माचे किंवा पंथाचे शिक्षण नव्हे. सर्व धर्माबद्दल सारखीच आदराची व समानत्वाची भावना सर्व विद्यार्थ्यांमध्ये जोपासण्यासाठी धार्मिक शिक्षणाची आवश्यकता गांधीनी प्रकट केली. भिन्न जातीमध्ये ऐक्यभावना

वाढावी, माझ्या धर्माबरोबरच अनय धर्मांची श्रेष्ठता मी जाणून घ्यावी व त्याबद्दल आदरभाव निर्माण व्हावा यासाठी धार्मिक शिक्षणाने भूमिका बजावावी` गांधींचे विचार आजही योग्यच वाटतात. जाती, धर्म यांच्या भिंती पाडूनच राष्ट्रीय ऐक्य नांदू शकते. याचा प्रत्यय अयोध्या निकालानंतरच्या प्रतिक्रियेतून दिसून येत आहे. आज प्रचारसभांना मतदारांना केवळ आवाहनाच्या माध्यमातून एकत्र आणता येत नाही. त्यासाठी गावोगावी गाडया पाठवाव्या लागतात. सुशिक्षित , उच्चशिक्षित , उच्चपदस्थ , डॉक्टर, प्राध्यापक, इंजिनियर कोणीही अशा भावनिक, धार्मिक व जातीय आवाहनांचे बळी ठरत नाहीत ते विवेकनिष्ठ दृष्टीकोनातून विचार करीत आहेत हे आजच्या काळातील राष्ट्रीय ऐक्याचे दृष्टीने निर्माण झालेले अल्हाददायक चित्र आहे असे म्हणता येईल. आम्हाला अहिंसेचा मार्गात हिंसा नको, युध्द नको , बुध्द(शांती) हवा, हा विचार आधुनिक भारताला प्रबळ करत आहे.

गांधीजी म्हणत शिक्षण आपणास स्वावलंबी , चारित्र्यसंपन्न, समता, सहिष्णुता, सहकार्याची भावना या उद्दिष्टांपर्यंत घेऊन जाईल. हा गांधीजींचा विचार निश्चितच समर्थनीय आहे. शिक्षण हे हात, बुध्दी आणि हृदय बळकट करणारे असावे हा विचार आजही पटतो. (Three h-hand, head and heart)

गांधीजीनी लैगिक शिक्षणाचा देखील पुरस्कार केला. जोपर्यंत भूत मुला मुलींच्या डोक्यावर बसेल तोपर्यंत कामातून क्रोध व क्रोधातून नाश ठरलेलाच आहे म्हणून कामकासनेच्या सुयोग्य शिक्षणाची व्यवस्था लावणे आवश्यक आहे. आज मात्र या विषयाला अभ्यासक्रमात स्थान द्यावे की न द्यावे याची चर्चाच अधिक होत आहे पण निर्णय होताना दिसत नाही.

आज सर्वांना सक्तीचे शिक्षण ही योजना शासकीय निर्णयाच्या आधारे राबविण्याचा प्रयत्न केला जातो हे एक निश्चितच प्रगतीच्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे. म. गांधीनी याच संदर्भात वर्धा शिक्षण योजना मांडली होती. त्यातील उद्दिष्टे सात ते चौदा वर्षापर्यंतच्या मुलांना प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व मोफत असावे अशाच प्रकारची होती

शेवटी असे म्हणता येईल मी तो सुरूवातीला केलेला अयोध्या निकालाचा उल्लेख व सर्वांनी दाखवलेला संयम या दोन्ही गोष्टी खऱ्याच आहेत. गांधीजीच्या शैक्षणिक तत्वज्ञानाचा पूर्ण जरी प्रभाव भारतीय समाजमनावर नसला तरी तो पूर्णपणे नाही असेही आपण म्हणू शकणार नाही. जाता जाता एवढीच अपेक्षा आहे की महात्मा गांधीजींच्या शैक्षणिक तत्वज्ञानाची सदयकालीन प्रस्तुतता यावरून स्पष्ट व्हावी.

संदर्भग्रंथ सूची:

1) महाराष्ट्र तत्वज्ञान कोष – दे.दि. वाडेकर

2) शिक्षणातील थोर विचारवंत – प्राचार्य रा.तु. भगत

3) माझे सत्याचे प्रयत्न – मोहन करमचंद गांधी

4) भारतीय तत्वज्ञानाचा ब्रहद इतिहास – ग.ना.जोशी

5) शैक्षणिक मानसशास्त्र – र.वी. पंडीत

6) माझ्या स्वप्नातील भारत – म. गांधी

7) Gandhian Management- Ram Pratap

8) शोध गांधीचा – चंद्रशेखर धर्माधिकारी